# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.05.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

**१. पश्चिम बंगालचे पहिले भाजप मुख्यमंत्री म्हणून सुवेन्दू अधिकारी यांचा शपथविधी**

**२. राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींना जलसमृद्ध आणि बालस्नेही गटांमध्ये देशात प्रथम क्रमांक**

**3. उद्योजक अभय फिरोदिया यांना पुण्यभूषण पुरस्कार प्रदान**

**३. शांघाय तिरंदाजी विश्व चषक स्पर्धेत साहिल जाधवला  कास्यपदक आणि**

**४. राज्यातील विविध भागात जोरदार पाऊस, रत्नागिरी जिल्ह्यात मोठं नुकसान**

**आता सविस्तर बातम्या**

**पश्चिम-बंगाल**

सुवेंदू अधिकारी यांनी, पश्चिम बंगालचे नववे आणि भाजपचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल त्यांचं अभिनंदन केलं तसंच त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्र्यांसोबत शपथ घेतलेल्या इतर पाच मंत्र्यांचंही पंतप्रधानांनी अभिनंदन केलं.  हे सर्व नेते मंत्री म्हणून पश्चिम बंगालच्या विकासाच्या प्रवासाला आणखी बळकट करतील, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

कोलकाता इथल्या 'ब्रिगेड परेड ग्राउंड'वर आयोजित एका भव्य समारंभात राज्यपाल आर. एन. रवी यांनी सुवेंदू अधिकारी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्र्यांसोबत शपथ घेतलेल्या पाच कॅबिनेट मंत्र्यांमध्ये दिलीप घोष, अग्निमित्रा पॉल, अशोक कीर्तनिया, निशीथ प्रामाणिक आणि क्षुदिराम टुडू यांचा समावेश आहे. भाजपनं पश्चिम बंगालमध्ये सत्ता मिळवण्यात प्रथमच यश मिळवलं आहे.

**तमिळनाडू**

TVK चे प्रमुख सी. जोसेफ विजय यांनी तमिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची काल चेन्नईत भेट घेऊन १२० आमदारांच्या पाठिंब्यासह तामिळनाडूमध्ये सरकार स्थापन करण्याचा दावा केला. तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री म्हणून ते आज शपथ घेणार आहेत. विधानसभा निवडणुकांमध्ये १०८ जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आलेल्या टीवीके म्हणजे 'तामिळगा वेट्री कळगम' या पक्षानं; काँग्रेस, डावे पक्ष, विदुथलाई चिरुथैगल काची आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग यांचा पाठिंबा मिळवून, २३४ सदस्यांच्या सभागृहात सरकार स्थापनेसाठी आवश्यक असलेली ११८ जागांची संख्या गाठली आहे.

**रवींद्रनाथ-जयंती**

रवींद्रनाथ ठाकूर यांची १६५ वी जयंती काल साजरी करण्यात आली. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'पचिशे वैशाख'च्या या शुभप्रसंगी गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर यांना आदरांजली अर्पण केली. गुरुदेवांचे योगदान केवळ साहित्याच्या क्षेत्रापुरतं मर्यादित नसून, ते त्याहीपलीकडे विस्तारलेले होतं असं समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. तर, रवींद्रनाथ ठाकूर हे असाधारण प्रतिभेचे लेखक, विचारवंत आणि कवी असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**<u>महाराणा प्रताप-जयंती</u>**

महाराणा प्रताप यांची जयंतीही काल साजरी करण्यात आली. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शाह यांनी महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त समाज माध्यमावरील संदेशांद्वारे त्यांना आदरांजली अर्पण केली.

**<u>हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे...</u>**

**<u>बाईट-पुरस्कार-आमंत्रण</u>**

फोर्स मोटर्स लिमिटेडचे अध्यक्ष डॉक्टर अभय फिरोदिया यांना पुण्यभूषण फाऊंडेशन आणि पुणेकरांच्या वतीनं अडतिसावा पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्याचा समारंभ काल पुण्यात पार पडला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. देशसेवा बजावताना जायबंदी झालेल्या सैनिकांचा गौरव देखील याप्रसंगी करण्यात आला. अभय फिरोदिया यांनी यांनी मूल्याधिष्ठीत व्यवसायिक म्हणून नाव कमावलं असा गौरव करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले ..

**<u>बाइट गडकरी</u>**

सत्काराला उत्तर देताना अभय फिरोदिया यांनी आपल्या कंपनीला मिळालेल्या मान्यतेमागील सूत्रं सांगितलं, ते म्हणाले ..

**<u>बाइट फिरोदिया</u>**

पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर रघुनाथ माशेलकर, यापूर्वीचे पुण्यभूषण पुरस्कारप्राप्त मान्यवर आणि पुणेकर याप्रसंगी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**<u>पंचायती-पुरस्कार</u>**

केंद्रीय पंचायती राज मंत्रालयानं काल जाहीर केलेल्या 'राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२५' मध्ये महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींनी जलसमृद्ध आणि बालस्नेही या दोन महत्त्वाच्या गटांमध्ये देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. ३ जूनला नवी दिल्लीत एका विशेष सोहळ्यात हे पुरस्कार दिले जाणार आहेत.

भंडारा जिल्ह्यातील इटगाव ग्रामपंचायतीनं 'बालस्नेही पंचायत' श्रेणीत १ कोटी रुपयांचं प्रथम पारितोषिक मिळवलं आहे. बालकांचा सर्वांगीण विकास आणि शैक्षणिक गुणवत्तेत हे गाव आदर्श ठरलं आहे. रायगड जिल्ह्यातील खारीवली ग्रामपंचायतीनं 'जलसमृद्ध पंचायत' श्रेणीत देशात प्रथम स्थान मिळवत १ कोटी रुपयांचा पुरस्कार जिंकला आहे.

नाशिक जिल्ह्यातील निंबळे ग्रामपंचायतीनं पारदर्शक प्रशासनासाठी 'सुशासन' श्रेणीत देशात द्वितीय क्रमांकाचं ७५ लाख रुपयांचं पारितोषिक मिळवलं तर रायगड जिल्ह्यातील चांभारली ग्रामपंचायतीनं 'सामाजिक न्याय आणि सुरक्षितता' या श्रेणीत देशात द्वितीय स्थानासह साडे सदतीसलाख रुपयांचा सन्मान मिळवला आहे.

**<u>दीक्षांत</u>**

विकसित भारत २०४७ च्या स्वप्नपूर्तीसाठी युवकांनी परिवर्तनाचं नेतृत्व करत सक्रिय योगदान द्यावं असं आवाहन केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल पुण्यात डॉक्टर डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या सतराव्या पदवीप्रदान समारंभात बोलताना केलं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलपती डॉक्टर पी. डी. पाटील होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही मानद पदवी देऊन गौरविण्यात आलं. विविध विद्याशाखांमधील प्रावीण्यप्राप्त 30 विद्यार्थ्यांना सुवर्ण पदकं देण्यात आली. तर 18 हजारपेक्षा जास्त स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली.

**क्षेपणास्त्र**

भारतानं काल ओडिशामधल्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम बेटावरून, 'MIRV' प्रणालीनं सुसज्ज असलेल्या प्रगत 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली.

या यशस्वी चाचणीबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 'DRDO', भारतीय लष्कर आणि संबंधित उद्योगांचं कौतुक केलं आहे. वाढत्या सुरक्षिततेच्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, देशाच्या संरक्षण सज्जतेमध्ये या चाचणीमुळं अभूतपूर्व भर पडेल, असं सिंह यांनी म्हंटलं आहे.

**मॅपिंग**

मतदार यादीतील पारदर्शकता आणि अचूकता वाढवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार SIR मॅपिंग मोहीम राबवली जात आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल पुण्यामध्ये अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपल्या मतदार ओळखपत्रातील माहितीची पडताळणी करून, हे मॅपिंग यशस्वीपणे पूर्ण केलं. दुबार नावं टाळण्यासाठी आणि मतदार यादीतील गोंधळ कायमचा दूर करण्याकरिता सर्व नागरिकांनी तातडीनं आपलं मॅपिंग पूर्ण करावं असं आवाहन पाटील यांनी सर्व मतदारांना केलं आहे.

**नेमबाजी**

चीनमधील शांघाय इथं तिरंदाजी विश्व चषक स्पर्धेतील पुरुषांच्या वैयक्तिक 'कंपाउंड' प्रकारात, महाराष्ट्राच्या साहिल जाधवनं काल कास्यपदक पटकावलं. त्यानं डेन्मार्कचा अनुभवी खेळाडू आणि प्रशिक्षक मार्टिन डॅम्सबो याचा १४७-१४४ अशा गुणांनी पराभव केला. गेल्या वर्षी शांघायमध्येच भारतानं 'कंपाउंड' प्रकारात पाच पदकं जिंकली होती.

**पाऊस-११रत्नागिरी५-६सिंधुदुर्ग५**

हवामानाच्या अंदाजानुसार काल राज्यात विविध ठिकाणी जोराचे वारे, वीजांसह पाऊस पडला. विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यात काल संध्याकाळी पडलेल्या मुसळधार पावसामुळं मोठं नुकसान झालं. त्याआधी वावटळीमुळं सर्वत्र धुळीचं साम्राज्य पसरलं होतं. नंतर पावसात झाडं कोसळली, घरांचे पत्रे उडाले, वीज पुरवठा खंडित झाला. संगमेश्वर तालुक्यात अनेक ठिकाणी सलग तिसऱ्या दिवशी विजांसह पाऊस पडला. रत्नागिरी-कोल्हापूर महामार्गावर पाणी साचलं आणि काही ठिकाणी घरात पाणी शिरलं. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही सलग तिसऱ्या दिवशी जोराचे वारे आणि वीजांसह पाऊस कोसळला. रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातही पावसानं हजेरी लावली.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून, मराठवाडा आणि विदर्भात वीजांसह  सोसाट्याच्या वारे तर कोकणात हवामान उष्ण आणि दमट राहण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

**१. पश्चिम बंगालचे पहिले भाजप मुख्यमंत्री म्हणून सुवेन्दू अधिकारी यांचा शपथविधी**

**२. राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींना जलसमृद्ध आणि बालस्नेही गटांमध्ये देशात प्रथम क्रमांक**

**3. उद्योजक अभय फिरोदिया यांना पुण्यभूषण पुरस्कार प्रदान**

**३. शांघाय तिरंदाजी विश्व चषक स्पर्धेत साहिल जाधवला  कास्यपदक आणि**

**४. राज्यातील विविध भागात जोरदार पाऊस, रत्नागिरी जिल्ह्यात मोठं नुकसान**

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**